# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:23.06.2025** **वार:सोमवार**

1. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकला जोडणाऱ्या सर्व रस्त्यांच्या विकासकामांना तत्वत: मान्यता
2. विधानभवनात आजपासून संसद आणि राज्यांच्या अंदाज समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेला प्रारंभ
3. लडाखमध्ये आयोजित सरहद शौर्यथॉनचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन
4. पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून दोघांना अटक आणि
5. विठुरायाच्या ओढीने पंढरीकडे निघालेल्या संतांच्या पालख्यांचं ठीकठिकाणी भक्तिमय वातावरणात स्वागत

**कुंभ-रस्ते विकास**

नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याला भाविकांची अलोट गर्दी अपेक्षित आहे; त्यामुळे वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी रस्त्यांची सुविधा तसंच आवश्यक रस्त्यांची निर्मिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयामार्फत करण्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तत्वतः मान्यता दिली. कुंभमेळ्याला भाविकांची होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन त्याचं यशस्वी नियोजन आणि पायाभूत रस्ते विकासाच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केंद्र शासनाच्या पातळीवर मदत करण्याची विनंती केली होती. यानुसार केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्र शासन आणि संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत नागपूरमधल्या मुख्यमंत्री कार्यालयात काल बैठक झाली; त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला.

कुंभमेळ्यापूर्वी नाशिक शहराला जोडणाऱ्या सर्व राष्ट्रीय महामार्गांचं विस्तारीकरण करण्याचे आदेश गडकरी यांनी दिले आहेत. याबाबत लवकरच विकास आराखडा तयार करून त्याला निधी उपलब्ध करून दिला जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीनंतर सांगितलं. ते म्हणाले.....

**जवळपास आठ प्रमुख रस्ते म्हणजे संभाजीनगरकडनं नाशिकला येणारे रस्ते असतील, नागपूरकडून येणारे रस्ते असतील, धुळ्याकडनं येणारे रस्ते असतील, गुजरातकडून येणारे रस्ते असतील, मुंबईकडून येणारे रस्ते असतील, पारघर कडनं येणारे रस्ते असतील असे सगळे जे रस्ते आहेत की, ज्याचा जास्तीत जास्त उपयोग हा कुंभच्या काळामध्ये होणार आहे. आणि प्लस काही अंतर्गत रस्ते देखील राष्ट्रीय महामार्गाकडे आहेत. अशा सगळ्या रस्त्यांच्या विकासाच्या संदर्भात आज ही बैठक झालेली आहे, आणि माननीय गडकरी साहेबांनी जवळपास या सगळ्या रस्त्यांना तत्वत: मान्यता दिलेली आहे. लवकरच त्याचा डीपीआर करून त्याला निधी उपलब्ध करून देण्यात येईल, आणि ते काम देखील पूर्ण करण्यात येईल यासोबत नाशिक रिंग रोडचा देखील विषय आज मंजूर झालेला.**

**संसदीय अंदाज समिती-परिषद**

देशाच्या संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला 75 वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त मुंबईत आज आणि उद्या एक राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. राज्यसभेचे उपसभापती हरीवंश सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या परिषदेत 'प्रशासनिक कार्ये सक्षमपणे आणि कमी खर्चात होतील याची सुनिश्चिती करण्यासाठी, अर्थसंकल्पीय अंदाजांचे पुनर्विलोकन आणि प्रभावी नियंत्रण यासाठी अंदाज समितीची भूमिका' या विषयावर विचारमंथन होईल. या परिषदेत संसदेसह, सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अंदाज समित्यांचे समिती प्रमुख आणि सदस्य सहभागी होणार आहेत.

**कारगिल-विजय दिवस**

कारगील विजय दिवसानिमित्त लडाखमध्ये आयोजित सरहद शौर्यथॉनला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल हिरवा झेंडा दाखवला. या मॅरेथॉनमध्ये देशभरातून अडीच हजारांहून अधिक धावपटू सहभागी झाले आहेत. यातून नागरिकांचा लष्करावर दृढ विश्वास

असल्याचं दिसून येत आहे, असं शिंदे यावेळी म्हणाले. भारतीय लष्कर आणि सरहद संस्था यांनी संयुक्तपणे आयोजित केलेला हा उपक्रम जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये शांतता, देशभक्ती आणि पर्यटन या दृष्टीनं महत्त्वपूर्ण आहे, असं ते म्हणाले. कारगिल युद्ध स्मारकासाठी महाराष्ट्र सरकारतर्फे तीन कोटी रुपयांचा धनादेश त्यांनी यावेळी लष्कराकडे सुपूर्द केला.

**<u>पहलगाम</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना आश्रय देण्यासह मदत केल्याच्या आरोपावरून एन आय ए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं काल पहलगाम इथल्या दोन स्थानिकांना ताब्यात घेतलं. या स्थानिकांनी हल्ल्यात सहभागी तिघांची ओळख उघड केली असून, ते लष्कर-ए-तैयबा या संघटनेसाठी काम करत असल्याला दुजोरा दिला आहे.

**<u>अकरावर्ष</u>**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्वानुसार काम करत केंद्र सरकारनं गेल्या 11 वर्षांत देशात अनेक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणलं आहे. ऊर्जा क्षेत्र हे त्यातील एक महत्त्वाचं क्षेत्र आहे. ऐकुया याबाबत एक वृत्तांत माझ्या सहकारी मेघना देशपांडे यांच्याकडून.....

**पारंपरिक आणि नवीकरणीय ऊर्जा स्रोतांसाठी ठोस धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे गेल्या दशकात देशाच्या उर्जा क्षेत्रात मागणी आणि पुरवठा या दोन्ही दृष्टीनं भरीव वाढ झाली आहे. सद्यस्थितीत देशाची ऊर्जा निर्मिती क्षमता 476 गिगावॅटपर्यंत पोहोचली असून, यापैकी जवळपास निम्मी ऊर्जा नवीकरणीय ऊर्जा स्रोतांच्या माध्यमातून होत आहे. सौर ऊर्जा क्षमतेत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर तर पवन ऊर्जा क्षमतेत चौथ्या क्रमांकावर आहे. पीएम- सूर्य घर योजना, पीएम-कुसुम योजना सामान्य नागरिकांना आणि शेतकऱ्यांनाही उपयुक्त ठरत आहेत. राष्ट्रीय हरित ऊर्जा अभियान, आंतरराष्ट्रीय सौर आघाडी या मोहिमांच्या माध्यमातून भारत एकीकडे आपली ऊर्जेची गरज भागवत आहे आणि त्याचवेळी स्वच्छ आणि हरित भविष्याकडे वाटचालही करत आहे.**

**<u>वारी</u>**

विठुरायाच्या ओढीने पंढरीकडे निघालेल्या विविध संतांच्या पालख्यांचं राज्यात ठीकठिकाणी अत्यंत भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात येत आहे. आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेली संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी काल दिवे घाटाचा अवघड टप्पा पार करून सासवडमध्ये पोहोचली. तर दुसरीकडे संत श्री तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा मांजरीमार्गे लोणी काळभोरच्या मुक्कामी पोहोचला.

आज माऊलींच्या पालखीचा मुक्काम सासवडमध्ये आहे; त्यासाठी सासवड इथला पालखीतळ सुसज्ज करण्यात आला असून मोठ्या प्रमाणात पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या ठिकाणी आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. वारकऱ्यांसाठी पिण्याचं स्वच्छ पाणी, आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माऊलींची पालखी आज दिवसभर सासवडमध्ये असल्यामुळे भाविकांच्या सोयीसाठी एसटी तसंच पीएमपीएमएल बसची सुविधा वाढवण्यात आली आहे. संत श्री ज्ञानेश्वर माऊलींची पालखी उद्या जेजूरीच्या दिशेनं मार्गस्थ होईल. संत श्री तुकाराम महाराजांची पालखी आज लोणी काळभोरहून यवतच्या दिशेनं मार्गस्थ होईल; पालखीचा मुक्काम आज यवतमध्ये आहे.

संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचं काल अहिल्यानगरमध्ये स्वागत करण्यात आलं. पालखीचा मुक्काम काल अहिल्यानगर शहरात होता; आज ही दिंडी पंढरपूर कडे मार्गस्थ होत आहे. संत मुक्ताईंची पालखीही काल बीडमध्ये पोहोचली. आज ती पुढे रवाना होईल.

आषाढी निमित्त पंढरपुरात येणाऱ्या दिंड्यांमध्ये सायकल्सच्या दिंडीनं सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. राज्यातल्या 80 शहरातून 4 हजार सायकल्सची दिंडी काल पंढरपुरात येऊन पोहोचली. सायकल स्वारांनी वारकरी परंपरेप्रमाणे सायकल वरून नगरप्रदक्षिणा केली. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे, ग्रामविकास, पंचायत राज मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी दिंडीत सहभाग घेतला.

पंढरपूर शहरात काल महास्वच्छता अभियान अभियान राबवण्यात आलं. यावेळी 148 टन कचरा गोळा करण्यात आला. सोलापूर जिल्हा प्रशासनातले अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक, आणि पंढरपूर शहरातल्या नागरिकांनी अभियानात सक्रिय सहभाग घेतला. वारीनंतरही याचप्रमाणे स्वच्छता मोहीम राबवणार असल्याचं सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितलं. स्वच्छ पंढरपूर, स्वच्छ चंद्रभागा यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असं आवाहन गोरे यांनी केलं. गोरे यांच्या हस्ते यावेळी स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

**क्रिकेट**

अँडर्सन -तेंडुलकर करंडकासाठी लीड्स इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी भारतानं 96 धावांची आघाडी घेतली आहे. पावसामुळे वेळ कमी केलेल्या या सामन्यात भारतानं 2 गडी बाद 90 धावा केल्या. के एल राहुल 47 आणि कर्णधार शुभमन गिल 6 धावांवर खेळत होते. इंग्लंडचा पहिला डाव 465 धावांवर संपल्यावर भारतानं पहिल्या डावात 471 धावा केल्या. शुभमन गिलनं 147 धावा तर ऋषभ पंत नं 134 धावा केल्या. भारतानं दुसऱ्या डावात 3 बाद 359 धावांवरून आपला खेळ सुरू केला.

**गोसीखुर्द-भंडारा**

भंडारा जिल्ह्यातला गोसीखुर्द सिंचन प्रकल्प पावसाळ्याच्या सुरवातीलाच तुडुंब भरला आहे. येत्या काळात वैनगंगेच्या खोऱ्यांमध्ये मुसळधार पाऊस पडल्यास वैनगंगा आणि भंडारा जिल्ह्यातून वाहणाऱ्या इतर नद्यांना मोठा पूर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून धरणातून पाणी सोडले जात असून प्रकल्प रिकामा करून ठेवला जात आहे.

**दरड**

सातारा जिल्ह्यात किल्ले सज्जनगड मार्गावर दरड कोसळली असून दरड हटविण्याचे काम सुरु असल्याचं राज्य आपत्कालीन कार्य केंद्रानं कळवलं आहे.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासात रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात आणि पुणे घाट परिसरात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तर कोकण किनारपट्टीवर उंच लाटांचा इशारा देण्यात आला असून लहान होड्यांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार